# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

आे.मि.डी.२।।

महाराष्ट्र पोलीस

OW/DCP- TRAFFIC /ADM/ NOTIFICATION/ ७६ /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–21092017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

११८९
२५।९।१७

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

कल्याण शहरात दि. २१/०९/२०१७ ते दि. ०१/१०/२०१७ या दरम्यान नवरात्र व दसरा उत्सव प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी किल्ले दुर्गाडी येथे दुर्गामाता उत्सव तसेच मोहरम सण साजरा होणार आहे. सदर काळात दुर्गामाता चौकातील व कल्याण शहरातील वाहतूक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए.–११६/सी.आर/३७/टी.आर.दि.७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित का. काळे, पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा, ठाणे पुढील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसचुना जारी करीत आहे:–

१) लालचौकी ते दुर्गामाता चौक मार्गे भिवंडी बाजूकडे जाणाऱ्या जड–मालवाहु वाहनांना लालचौकी येथे १७.०० ते २२.०० वा. दरम्यान **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने लालचौकी येथुन उजवीकडे वळून आधारवाडी चौक– गांधारी ब्रिज मार्गे पडघा बाजूने इच्छित स्थळी जातील.

२) भिवंडी कडून दुर्गा माता चौकातून लालचौकी कडे जाणाऱ्या जड–मालवाहु वाहनानां दुर्गाडी चौक येथे १७.०० ते २२.०० वा.दरम्यान **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने दुर्गामाता चौकातुन डाव्या बाजूस वळून वाडेघर चौक – आधारवाडी चौक मार्गे मुरबाड रोड हायवे अथवा लालचौकी येथून इच्छित स्थळी जातील.

३) गोविंदवाडी बाहयवळण मार्गावरून पत्रीपुलाकडे तसेच पत्रीपुलाकडुन दुर्गाडी कडे येणारी लहान वहाने (कार, रिक्षा इत्यादी ) वाहनांना सायंकाळी १७.०० वा. पासुन २४.०० वा. पावेतो **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– अ) सदरची वाहने जुना आग्रारोडने पत्रीपुल– वलीपीर– गुरूदेव हॉटेल– शिवाजी चौक– सहजानंद चौक–लालचौकी मार्गे दुर्गाडी येथुन इच्छित स्थळी जातील.
ब) तसेच दुर्गाडी येथुन लालचौकी – सहजानंद चौक – शिवाजी चौक – गुरूदेव हॉटेल – वलीपीर येथुन पत्रीपुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही नवरात्रौत्सव/दसरा या कालावधीत म्हणजेच दिनांक २१/०९/२०१७ ते दिनांक ०१/१०/२०१७ रोजी २४.०० वा. पावेतो अंमलात राहील. सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

A.Kale
२५।०९।१७

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा.आयुक्त, कल्याण–डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.

मा.जिल्हाधिकारी,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३,कल्याण, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ कल्याण वाहतूक उपविभाग.

प्रभारी अधिकारी, कल्याण/कोळसेवाडी/उल्हासनगर वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.